# अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक,
# महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशासकीय मध्यवर्ती इमारत,
# दक्षिण बाजू, दुसरा मजला, पुणे-४११००१

महाराष्ट्र शासनाच्या कारागृह विभागाचे अधिनस्त विविध कार्यालयातील अराजपत्रित गट-ब, क व ड मधील रिक्त पदे भरण्यासाठी रिक्त पदांचा आढावा घेऊन खालील नमूद संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन **(online)** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. रिक्त पदांचा तपशिल शैक्षणिक अर्हता, विहीत केलेली वेतनश्रेणी, सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, नियुक्तीच्या अटी व शर्ती ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबतच्या सूचना महाराष्ट्र कारागृह विभागाच्या **www.mahaprisons.gov.in** या संकेतस्थळावर व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) या संस्थेच्या **http://oasis.mkcl.org/prison** संकेतस्थळावर **दिनांक १२/०८/२०१३ पासून ते १०/०९/२०१३ पर्यन्त उपलब्ध आहेत.**

| अ.क्र | पदाचे नाव | पदाची वेतनश्रेणी | पदांची संख्या | पदाचे आरक्षण | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुरुंग अधिकारी श्रेणी-२ | ९३००-३४८०० ग्रे.पे.४३०० | ५१ | अ.जाती-७<br>अ.जमा-३<br>विजाअ-३<br>भजब-२<br>भजक-१<br>इमाव-१६<br>खुला-१९ | मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधर.<br>**शारीरिक अर्हता**<br>**पुरुष उमेदवार**<br>उंची-१६२ सेमी<br>छाती-७६ सेमी न फुगवता व फुगवून ८२ सेमी<br>**महिला उमेदवार**<br>उंची १५८ सेमी<br>वजन ४५ कि.ग्रॅ. | ---- |

**समांतर आरक्षण**

| | जात प्रवर्ग | एकूण पद संख्या | सर्वसाधारण | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनु.आती | ७ | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ |
| | अनु.जमाती | ३ | २ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | वि.जा.-अ | ३ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० |
| | भ.ज.-ब | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | भ.ज.-क | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | इमाव | १६ | १२ | ४ | २ | १ | १ | ० | २ |
| | खुला | १९ | १३ | ६ | ३ | २ | १ | १ | २ |
| | **एकूण** | **५१** | **३६** | **१५** | **७** | **३** | **२** | **१** | **५** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | मिलींग पर्यवेक्षक | ५२००-२०२०० व ग्रे.पे.२४०० | १ | अनारक्षित | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील वुलन टेक्नीशीयन प्रमाणपत्र अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | वुलन मिल मधील मिलींग व वुलन रेझीन दोन वर्षे प्रत्यक्ष अनुभव |
| ३ | गालीचा पंजा दरी निदेशक | ५२००-२०२०० व ग्रे.पे.२४०० | १ | अनारक्षित | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण, व संचालक तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील विव्हींग टेक्नॉलॉजीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक व त्यानंतरचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव आवश्यक अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | वस्त्रोद्योग मिल मधील हॅन्डलुम डिप्लोमा टेक्नॉलॉजी अनुभव |
| ४ | प्रिपरेटरी | ५२००-२०२०० व ग्रेपे २४०० | १ | अनारक्षित | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील वार्पीग, साईजिंग, वायंडींग प्रमाणपत्र अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | प्रिपरेटरी विभागाचा दोन वर्षाचा अनुभव |
| ५ | गवंडी निदेशक (मेसन मिस्त्री) | ५२००-२०२०० व ग्रेपे २४०० | १ | अनारक्षित | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील गवंडी कारागीर प्रमाणपत्र धारक अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | गवंडी कामाचा अनुभव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ब्रेल लिपी निदेशक | ५२००-२०२०० व ग्रेपे २४०० | १ | अनारक्षित | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व शासनाने विहीत केलेले अंध शिक्षकाच्या प्रशिक्षकाचे अभ्यासक्रम बाबतचे प्रमाणपत्र व एक वर्ष शासनमान्य शाळेतील अंध शिक्षकाचा अनुभव आवश्यक | ----- |
| ७ | रसायन पर्यवेक्षक | ५२००-२०२०० व ग्रेपे २४०० | १ | अनारक्षित | मान्यता प्राप्त विद्यापीठातून रसायनशास्त्र मुख्य विषय घेऊन बीएससी पदवी किंवा पदवीका किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थे कडील सर्टीफिकेट इन केमिकल टेक्नॉलॉजी (सोप ॲण्ड ऑईल) अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | |
| ८ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ५२००-२०२०० व ग्रेपे २८०० | ३ | खुला-२<br>विजा अ-१ ( १-पद खुला अस्थीव्यंग अपंगासाठी राखीव ) | भौतिक व रसायन हे विषय घेऊन शास्त्र शाखेची इंटरमिजिएट परिक्षा अथवा एचएससीउत्तीर्ण आणि शासन मान्यता प्राप्त संस्थेकडील प्रयोगशाळा तंत्राचे एक वर्षाचे प्रशिक्षण उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | |
| ९ | विणकाम निदेशक | ५२००-२०२०० व ग्रेड पे २४०० | ४ | अ.जाती-१<br>अ.जमा-१<br>विजाअ-१<br>खुला-१ | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य किंवा शासन मान्यताप्राप्त संस्थे कडील विव्हींग टेक्नॉलॉजीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक व | प्रथम / द्वितीय श्रेणी धारण करणारे व वस्त्रोद्योगमधील अनुभव आवश्यक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | त्यानंतरचा कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव आवश्यक अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | |
| १० | शिवणकाम निदेशक | ५२००-२०२०० व ग्रेड पे २४०० | ३ | अ.जमा-१ विजाअ-१ भजब-१ | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडील अथवा मान्यता प्राप्त संस्थेकडील मास्टर टेलर प्रमाणपत्र व दोन वर्षाचा अनुभव अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | दोन वर्षे प्रत्यक्ष कामाचा अनुभव |
| ११ | लोहारकाम निदेशक | ५२००-२०२०० व ग्रेड पे २४०० | ३ | अ.जमा-१ विजाअ-१ खुला-१ | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडील अथवा मान्यता प्राप्त संस्थेकडील समतुल्य लोहारकाम प्रमाणपत्र अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | दोन वर्षाचा लोहारकाम विभागातील अनुभव आवश्यक |
| १२ | चर्मकला निदेशक | ५२००-२०२०० व ग्रेड पे २४०० | १ | अनारक्षित-१ | एसएससी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व १) फुटवेअर मॅन्युफॅक्चरींग प्रमाणपत्र २) शुज, चप्पल, बेल्टबाबत दोन वर्षाचा मॅन्युफॅक्चरींगचा अनुभव अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | ---- |
| १३ | बेकरी निदेशक | ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २४०० | २ | अ.जाती-१ अ.जमा-१ | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडील अथवा मान्यता प्राप्त संस्थेकडील समतुल्य बेकरी क्राप्ट, मॅनशिफट कन्फेशनरी आणि बेकरी | दोन वर्षाचा बेकरी पदार्थ बनविण्याचा प्रत्यक्ष अनुभव आवश्यक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रमाणपत्र अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | |
| १४ | सुतारकाम निदेशक | ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २४०० | २ | भजब-१<br>भजक-१ | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडील अथवा मान्यता प्राप्त संस्थेकडील समतुल्य सुतारकाम प्रमाणपत्रअथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | दोन वर्षाचा सुतारकाम व्यवसायातील अनुभव आवश्यक |
| १५ | ताणाकार ( वार्पर ) | ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २४०० | ६ | अजाती-१<br>विजाअ-१<br>भजब-१<br>खुला-३ | एस एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडील अथवा मान्यता प्राप्त संस्थेकडील समतुल्य ताणाकार प्रमाणपत्र अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | सिल्क/ कॉटन वार्पिग मशिनवर काम करण्याचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक |
| १६ | करवत्या | ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २४०० | १ | अ.जाती-१ | १) ४ थी पास<br>२) शारीरिकदृष्टया तंदुरस्त<br>३) सॉ-मिल मधील करवत्या कामाचा १ वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | |
| १७ | मिश्रक | ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २८०० | ५ | अ.जाती-१<br>भजक-१<br>अ.जमाती १<br>विजाअ-१<br>खुला (अपंग अनुशेष)-१ | एस एस सी/एच एस सी अथवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण व औषधे व्यवसायाची पदविका किंवा पदवी उत्तीर्ण तसेच पंजीकृत औषध व्यवसायिक म्हणून नोंदणी आवश्यक अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | अनुभव असल्यास प्राधान्य |
| १८ | लघुलेखक (नि.श्रेणी) | ९३००-३४८०० व | ४ | अ.ज-१<br>खुला-३ | १) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | -- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ग्रेड वेतन ४३०० | | (एक पद महिलांसाठी आरक्षित) | अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक<br>२) मराठी लघुलेखन १०० श.प्र.मि. तसेच मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक | |
| १९ | शिक्षक | ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २४०० | १२ | अ.जाती-२<br>अ.जमाती-३<br>भजब-१<br>भजक-१<br>इमाव-१<br>खुला-४ | एचएससी किंवा तत्सम व शिक्षण पदविका उत्तीर्ण अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | अनुभव असल्यास प्राधान्य |

**समांतर आरक्षण**

| | जात प्रवर्ग | एकूण पद संख्या | सर्वसाधारण | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अनु.जाती | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | अ.जमाती | ३ | २ | १ | ० | ० | १ | ० | ० |
| | भज-ब | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | भज-क | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | इमाव | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | खुला | ४ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१२** | **९** | **३** | **१** | **१** | **१** | **०** | **१** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | गृह पर्यवेक्षक | ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २४०० | १ | अ.जाती-१ | एचएससी किंवा तत्सम व शिक्षण पदविका उत्तीर्ण अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक | अनुभव असल्यास प्राधान्य |
| २१ | वरिष्ठ लिपीक | ५२००-२०२०० व ग्रेड वेतन २४०० | २० | अ.जाती-२<br>अ.जमाती-३<br>भज ब-१<br>विमाप्र-१<br>इमाव-५<br>खुला-८ | कोणत्याही शाखेचा पदवीधर, संगणकविषयक अर्हता परीक्षा (MS-CIT किंवा तत्सम) उत्तीर्ण किंवा संगणक हाताळण्याचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक | अनुभव असल्यास प्राधान्य |
| | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **समांतर आरक्षण** | | | | | |
| | **जात प्रवर्ग** | एकूण पद संख्या | सर्वसाधारण | महिला | माजी सैनिक | खेळाडू | प्रकल्प ग्रस्त | भुकंप ग्रस्त | अंशकालीन |
| | **अनु.जाती** | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | **अ.जमाती** | ३ | २ | १ | ० | ० | १ | ० | ० |
| | **भज-ब** | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | **विमाप्र** | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **इमाव** | ५ | ४ | १ | १ | ० | ० | ० | १ |
| | **खुला** | ८ | ५ | ३ | १ | ० | ० | ० | १ |
| | **एकूण** | **२०** | **१४** | **६** | **२** | **१** | **१** | **०** | **२** |
| २२ | शिपाई, (Peon) वर्ग-४ | ४४४०-७४४० व ग्रेड वेतन १३०० | ०४ | अ.जाती-१<br>अ.जमाती-१<br>वि.जा.अ-१<br>खुला-१ | इयत्ता ८ वी उत्तीर्ण आवश्यक | | | | |

वरील रिक्त पदांच्या संख्येत तसेच त्यानुसार सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव रिक्त पदांच्या संख्येत सामाजिक व समांतर आरक्षणातही बदल करण्याचे किंवा भरती प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राखून ठेवत आहेत.

**कमाल व किमान वयोमर्यादा :-** उक्त पदांसाठी अर्जदाराचे वय दि.३१.०७.२०१३ रोजी किमान १८ पेक्षा कमी व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीय व इतर घटकासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या प्रचलित शासन निर्णयानुसार कमाल वयोमर्यादेत सुट अनुज्ञेय आहे.)

**निवड पध्दती :-**

**१)** जाहिरातीत नमूद केलेल्या अ.क्र.२ ते १८ पदांकरीता तांत्रिक अर्हता असल्यामुळे व्यावसायिक चाचणी घेणे आवश्यक आहे. यास्तव त्या पदासाठी १०० गुणांची लेखी परीक्षा, ८० गुणांची व्यावसायिक चाचणी व २० गुणांची मुलाखत परीक्षा घेण्यात येईल. अ.क्रं. २२ शिपाई वर्ग-४ या पदाकरीता ७५ गुणांची लेखी परीक्षा व २५ गुणांची मुलाखत परीक्षा घेण्यात येईल.

२) वरिष्ठ लिपीक, शिक्षक व गृह पर्यवेक्षक पदांकरीता फक्त २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

**३)** तुरुंगाधिकारी श्रेणी-२ पदाकरीता १०० गुणांची लेखी/ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर पदासाठी शारिरीक अर्हता आवश्यक असल्यामुळे उमेदवारांची ८० गुणांची शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. सदरील शारिरीक चाचणी परिक्षेत ५० टक्के गुण मिळविणे आवश्यक

आहे. लेखी परिक्षा व मैदानी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची २० गुणांची मुलाखत परीक्षा घेण्यात येईल.

**पुरुष उमेदवार : १) ८०० मीटर धावणे** २) पुलअप्स ३) गोळाफेक ४) लांबउडी

**महिला उमेदवार** : १) २०० मीटर धावणे २) तीन किलोमीटर चालणे ३) गोळाफेक

४) प्राप्त गुणवत्ता क्रमानुसार व आरक्षणानुसार निवड यादी तयार करण्यात येईल.

५) ज्या पदांकरीता कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी ) आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व ज्या पदांकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु मराठी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी ) च्या दर्जाच्या समान राहील.

**लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र**

महाराष्ट्र नागरी सेवा(लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ च्या अधिसूचनेनुसार कारागृह विभागाच्या सेवाप्रवेशासाठी लहान कुटूंबाचे नमुना अ मधील प्रतिज्ञापत्र उमेदवाराने मुलाखतीपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

**मराठी भाषेचे ज्ञान :-** उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक राहील.

**भरती प्रक्रिया शुल्क :-**

खुल्या गटातील उमेदवारांसाठी **रु.५००** आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये **२५०/-** एवढे भरती प्रक्रिया शुल्क जाहिरातीत नमुद केलेल्या पध्दतीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भरावे लागेल. माजी सैनिकांना अर्जासोबत भरती प्रक्रिया शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

१) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जाईल.

२) ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे अर्ज http://oasis.mkcl.org/prison या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

**३) ऑनलाईन अर्ज करण्याचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यन्त |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | १२.०८.२०१३ | ०४.०९.२०१३ |
| २ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | १३.०८.२०१३ | ०६.०९.२०१३ |
| ३ | ज्या उमेदवाराने बँकेमध्ये दिनांक ०६.०९.२०१३ पर्यन्त भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उर्वरित ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | ---- | १०.०९.२०१३ |

४) ऑन लाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना MKCL या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/prison या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी उमेदवार MKCLयांच्या अधिकृत प्रशिक्षण केंद्राची मदत व मार्गदर्शन घेऊ शकतील. अधिकृत प्रशिक्षण केंद्राची (Authorised Learning Center) पत्त्यासह माहिती http://oasis.mkcl.org/prison संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

५) उमेदवाराने वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर (Webside) Apply Online) या लिंकवर क्लिक करावे व सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Register) या बटनावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. केवळ नोंदणी (Registation) केली म्हणजे अर्ज भरला असे होत नाही.

६) नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application Form Number) व पासवर्ड (Password) काळजीपूर्वक स्वतःकडे पुढील प्रक्रियेसाठी जपून ठेवावा.

७) त्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटनावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे.

८) या प्रिंट केलेल्या चलनावर नमूद केलेली फी केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI)च्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या **दुस-या** दिवशी तसेच वरील तक्त्यातील वेळापत्रकात नमूद केलेल्या मुदतीच्या आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील. व त्याची एक प्रत स्वतःकडे जपून ठेवावी. अर्जाची फी भरणेसाठी बँकेने आकारलेले शुल्क उमेदवाराने बँकेत भरावे.

९) बँकेत फी भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुस-या दिवशी उमेदवाराने आपला उर्वरित अर्ज भरावा.

१०)उर्वरित अर्ज सादर करताना उमेदवारांने स्वतःचा नवीनतम **(लेटेस्ट)** फोटो व स्वतःची स्वाक्षरी दोन्ही स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

११)उमेदवाराने संपूर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट कॉपी काढून घेऊन ती स्वतःजवळ ठेवावी.

१२) वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया व उर्वरित अर्ज भरणे) प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार लेखी परीक्षा देण्यासाठी पात्र होईल.

१३) उमेदवारांच्या माहिती व मदतीकरीता मे. MKCLयांच्या कॉल सेंटरवरील दूरध्वनी क्रमांक **९३२६५५२५२५** वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

**१४)** उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वतःचा मोबाईल नंबर व ईमेल आयडी असल्यास नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

**महत्त्वाच्या सूचना :-**

**१)** पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये. तसेच यापूर्वी कारागृह विभागात नोकरीकरिता केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**२)** लेखी किंवा ऑनलाईन परिक्षेची तारीख कारागृह विभागाच्या www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर व **MKCL** या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/prison संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल. लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र व परिक्षास्थळ **MKCL** या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/prison या संकेतस्थळावर परिक्षेपूर्वी आठ दिवस आधी अर्ज क्रमांकानुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी त्यांचा अर्ज क्रमांक संकेतस्थळावर नमूद करुन लॉग ऑन केल्यानंतर प्रवेशपत्राची प्रिंट प्राप्त करुन घ्यावी.

**लेखी किंवा ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारास पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाहीत.**

**३)** उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी.

**४)** मूळ कागदपत्रे मुलाखतीचे वेळी तपासणी साठी सादर करणे आवश्यक राहील.

**५)** लेखी **किंवा ऑनलाईन** परिक्षेतील गुणानुक्रम व आरक्षण विचारात घेऊन पात्र झालेल्या उमेदवारांची नावे कारागृह विभागाच्या www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर व MKCL या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/prison संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**६)** लेखी/ऑनलाईन परिक्षा ही उमेदवारांच्या कोणत्याही कागदपत्रांची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर, व्यावसायिक चाचणी परिक्षा, मुलाखतीतील उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक / समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

**७)** सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठी लेखी किंवा ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेण्यात येणार असल्याने परिक्षा संदर्भातील सविस्तर माहीती http://oasis.mkcl.org/prison
व www.mahaprisons.gov.in या संकेतस्थळावर त्या त्या वेळी प्रसिध्द करण्यात येईल. त्यामुळे भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कृपया उमेदवारांनी वरील संकेत स्थळावरील माहीती वेळोवेळी पहावी.

**८)** राज्य शासनाच्या कोणत्याही सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असली तरी (उदा.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र) वरील पदासाठी विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

**९)** एकदा ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही, याची उमेदवाराने नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील स्वतः जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

**१०)** लेखी **किंवा ऑनलाईन** परिक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी माहीती MKCL या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/prison संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

**११)** उमेदवारांने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पूर्ण करतो किंवा नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क

परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे / कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निर्देशनास आल्यास त्याची / तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येवून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

**१२)** उमेदवारांना लेखी **किंवा ऑनलाईन** परिक्षेसाठी,शारिरीक चाचणी व मुलाखत परिक्षेसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**१३)** परिक्षेच्या वेळी परिक्षा कक्षामध्ये किंवा परिक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी अथवा इतर संपर्काची साधने वापरण्यास मनाई आहे.

**१४)** समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्याच जाती प्रवर्गातील इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.

**१५)** उमेदवाराकडे महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक राहिल.

**१६)** **(अ)** इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड या मागास प्रवर्गातील उमेदवारांना सामाजिक आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले चालु वर्षाचे प्रमाणपत्र (नॅान क्रिमिलेअर सर्टिफिकेट) **अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**(ब)** इमाव, विमाप्र, विजा-अ, भज-ब, भज-क व भज-ड आणि खुल्या गटातील महिलांना ३० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी त्यांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-याने दिलेले चालु वर्षाचे प्रमाणपत्र (नॅान क्रिमिलेअर सर्टिफिकेट) अंतिम निवडपूर्व कागदपत्र तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१७)** अर्जासोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील छोट्या कुटूंबाचे व अर्जातील माहिती खरी असल्याचे प्रतिज्ञापत्र मुलाखतीपूर्वी उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहिल.

**१८)** मागासवर्गीय प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारांना, महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय दिनांक १२.१२.२०११ नुसार आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतर सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे ही संबंधित उमेदवाराची जबाबदारी राहिल.अन्यथा सदर उमेदवाराची कारागृह विभागातील सेवा समाप्त करण्यात येईल.

**१९)** मुलाखतीसाठी पात्र झालेल्या उमेदवारांना मुलाखतीच्या दिवशी खालील मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रती (Attested Copies) या केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी,पोस्टमास्तर मुख्याध्यापक,यांचेकडून साक्षांकित करुन तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**०१.** शैक्षणिक/ व्यावसायिक/ तांत्रिक अर्हता प्राप्त केलेली प्रमाणपत्रे/ गुणपत्रिका.

**०२.** जातीचा दाखला/ जात वैधता प्रमाणपत्र

**०३.** वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्माचा दाखला

**०४.** विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे प्रमाणपत्र

**०५.** प्रकल्पग्रस्त असल्यास उमेदवाराचे नावे सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र

**०६.** लहान कुटूंब असल्याचे व अर्जात भरलेली माहिती खरी असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापन

**०७.** अधिवास प्रमाणपत्र.

**०८.** या शिवाय उमेदवाराला जे जे लागू होते त्या त्या दाखल्यांच्या प्रती इ.

**२०)** जाहिरातीत दिलेली पदसंख्या कमी -जास्त/बदल होण्याची शक्यता आहे. निवड झालेल्या उमेदवारांना राज्यातील कोणत्याही कारागृह/संस्थेत नेमणूका देण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र कारागृह विभागाचे नियम बंधनकारक राहतील. कारागृह विभागाच्या सेवा प्रवेश नियमात नमूद केलेल्या पदांना आवश्यक असणा-या परिक्षा विहीत कालावधीत उत्तीर्ण होणे उमेदवारास बंधनकारक असेल व सदर पदाच्या परिक्षेकरिता कारागृह विभागाच्या सेवा प्रवेश नियमात नमूद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

**२१)** तुरुंगाधिकारी श्रेणी-२ या पदावर रुजू झाल्यानंतर ३ (तीन) वर्षे सेवा पूर्ण केल्याशिवाय राजीनामा देता येणार नाही. जर राजीनामा द्यावयाचा झाल्यास रुजू दिनांकापासून राजीनामा देईपर्यंतच्या कालावधीत अदा करण्यात आलेले संपूर्ण वेतन व भत्ते, प्रशिक्षण खर्च तसेच बंधपत्रात नमुद केलेली संपूर्ण रक्कम एकरक्कमी वसूल केली जाईल.

**२२)** सदर भरती प्रक्रिया पूर्णतः वा अंशतः रद्द करण्याचे अथवा त्यात बदल करण्याचे अधिकार अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे १ हे राखून ठेवत आहेत.

**(मीरां बोरवणकर)**
अध्यक्ष राज्य निवड समिती (कारागृह)
तथा अपर पोलीस महासंचालक
व कारागृह महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, पुणे १